**राज्यात कौशल्य प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यासाठी महाराष्ट्र राज्य व्यवसाय प्रशिक्षण परिषदेमार्फत व्यवसाय अभ्यासक्रमांना तसेच व्यवसाय प्रशिक्षण संस्था/कौशल्य चाचणी संस्थांना संलग्नता देण्याबाबतची कार्यपध्दती......**

**महाराष्ट्र शासन**
**कौशल्य विकास व उद्योजकता विभाग,**
**शासन निर्णय क्रमांक: कौविउ- २०१७/प्र.क्र.२३७/अभियान-१,**
**२ रा मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,**
**मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.**

**दिनांक : २६ डिसेंबर, २०१७**

<u>वाचा</u> : १) शासन निर्णय, कौशल्य विकास व उद्योजकता विभाग, क्रमांक कौविउ-२०१५/ प्र.क्र.१२२/रोस्वरो-१, दिनांक ०२/०९/२०१५.
२) शासन निर्णय, कौशल्य विकास व उद्योजकता विभाग, कौविउ-२०१५/प्र.क्र.३७/ अभि-१, दिनांक २३/११/२०१५.
३) शासन निर्णय, कौशल्य विकास व उद्योजकता विभाग, क्रमांक आयटीआय- २०१४/प्र.क्र.१४८/व्यशि-३, दिनांक १८/०१/२०१७.
४) महाराष्ट्र राज्य व्यवसाय प्रशिक्षण परिषद यांचे पत्र क्रमांक MSCVT/SOP/ २०१७/०२, दिनांक ०३/११/२०१७.

## प्रस्तावना:

विस्तारीत बाजारपेठ, नैसर्गिक साधनसामुग्रीचा मोठया प्रमाणातील स्त्रोत, कमी उत्पादन खर्च व विपुल मनुष्यबळ यामुळे भारतात विदेशी गुंतवणूक मोठ्या प्रमाणात वाढत आहे. परिणामी स्थानिक, राष्ट्रीय व जागतिक पातळीवर विविध क्षेत्रात मोठया प्रमाणात रोजगाराच्या संधी निर्माण होत आहेत. या संधींच्या माध्यमातून देशाच्या अर्थव्यवस्थेत शाश्वत वृध्दी व विकास होण्यासाठी प्रशिक्षित आणि कुशल मनुष्यबळ असणे अत्यंत आवश्यक आहे. या पार्श्वभूमीवर विविध उद्योग व इतर क्षेत्रांतील संधींचा फायदा घेण्यासाठी भारतातील कार्यप्रवण वयोगटातील उमेदवारांना अर्थव्यवस्थेच्या विविध क्षेत्रांमध्ये बदलत्या आधुनिक तंत्रज्ञानानुरूप कौशल्याधारीत प्रशिक्षणाद्वारे उत्पादनक्षम बनविण्याच्या दृष्टीने "कौशल्य विकास" या कार्यक्रमास राष्ट्रीय प्राधान्य देऊन केंद्र शासनामार्फत सन २००९ मध्ये राष्ट्रीय कौशल्य विकास कार्यक्रम सुरू करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अनुषंगाने महाराष्ट्र राज्यात राष्ट्रीय कौशल्य विकास कार्यक्रमाची अंमलबजावणी सन २०१० पासून करण्यात आली. या कार्यक्रमांतर्गत देशामध्ये सन २०२२ पर्यंत ५० कोटी कुशल मनुष्यबळ निर्मिती करण्याचे उद्दिष्ट लक्षात घेता महाराष्ट्रासाठी ४.५० कोटी मनुष्यबळाचे कौशल्य विकसन करण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे.

सन २०१४ पासून मा. पंतप्रधान यांच्या "मेक इन इंडीया" या संकल्पनेस अनुसरून "स्किल इंडिया" या नावाने कौशल्य विकास कार्यक्रमास केंद्र शासनाने सर्वोच्च प्राधान्य दिले आहे. याच धर्तीवर राज्यात "**कुशल महाराष्ट्र, रोजगारयुक्त महाराष्ट्र**" हे धोरण राबविण्यात येत आहे.

राज्यात मोठ्या प्रमाणात कौशल्याधारीत अभ्यासक्रमांचे प्रशिक्षण देणाऱ्या खाजगी कौशल्य प्रशिक्षण संस्था कार्यरत आहेत. त्यांच्यामार्फत १ महिना ते ९ महिने कालावधीचे मेकॅनिकल, संगणक, हॉटेलींग, डिझायनिंग, रिटेल, अकौंटींग, शिवण व कर्तन इत्यादी विविध क्षेत्रातील व्यवसाय अभ्यासक्रमांचे प्रशिक्षण देण्यात येते. तथापि, सदर प्रशिक्षण कार्यक्रम राबविताना पुढील त्रुटी प्रकर्षाने निदर्शनास येत आहेत.

१) कौशल्याधारीत अभ्यासक्रमाच्या अनुषंगाने Job Role, Qualification Packs (QPs), National Occupational Standards (NOs), पायाभूत व प्रशिक्षण सुविधांची मानके (जसे की, जागा, यंत्रसामुग्री, हत्यारे, इत्यादी) प्रशिक्षणार्थी/प्रशिक्षक यांची किमान शैक्षणिक अर्हता, परिक्षा पध्दती, Marking Pattern व प्रमाणपत्र यामध्ये एकसुत्रता नसते.
२) औद्योगिक/सेवा/व्यापार क्षेत्रातील आस्थापनांच्या कौशल्याच्या मागणीनुसार अभ्यासक्रम तयार करण्यात येत नाहीत.
३) प्रशिक्षणोत्तर परिक्षा ह्या संबंधीत खाजगी प्रशिक्षण संस्थांमार्फत घेण्यात येतात व त्यांच्याच मार्फत प्रमाणपत्र देण्यात येत असल्यामुळे अशा प्रमाणपत्रास औद्योगिक व व्यावसायिक आस्थापनांकडून मर्यादित स्विकृती (Limited Acceptance) प्राप्त होते.
४) प्रशिक्षण शुल्कावर कोणतेही निर्बंध नसून, प्रशिक्षणार्थ्यांना परिपूर्ण/सखोल प्रशिक्षण मिळेल तसेच पायाभूत/प्रशिक्षण सुविधा उपलब्ध होतील याबाबत कोणतीही शाश्वती नसते.
५) प्रशिक्षण संस्थांमार्फत प्रमाणपत्र देण्याचे कोणतेच निकष नसतात.
६) अभ्यासक्रम पूर्ण करणाऱ्या प्रशिक्षणार्थ्यांना शिकाऊ उमेदवारी अंतर्गत सामावून घेण्याची व्यवस्था नसते, इत्यादी.

त्याचप्रमाणे सन २०१३ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. २० "महाराष्ट्र राज्यात कृषि, पशु व मत्स्य विज्ञान, आरोग्य विज्ञान, उच्च व तंत्र व व्यवसाय शिक्षण यांमधील अनधिकृत संस्था स्थापन करण्यास आणि अनधिकृत अभ्यास पाठयक्रम सुरू करण्यास मनाई करण्याकरीता व तत्संबंधित किंवा तद्नुषंगिक बाबींकरीता तरतूद करण्यासाठी अधिनियम" पारीत करण्यात आलेला आहे. या अधिनियमातील तरतुदींची अंमलबजावणी करणे क्रमप्राप्त आहे.

सद्य:स्थितीत महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी (Maharashtra State Skill Development Society - MSSDS) यांचेमार्फत कौशल्य प्रशिक्षण संस्था (Skill Training Provider) यांना विविध कौशल्य विकास कार्यक्रमांतर्गत व्यवसाय प्रशिक्षण देण्यासाठी सूचिबध्द करण्यात येत आहे. तसेच ज्या संस्थांना NCVT/SSCs इत्यादींनी मान्यता दिलेल्या अभ्यासक्रमांचे

प्रशिक्षण देण्यासाठी विहित प्राधिकरणांची संलग्नता प्राप्त झाली असेल, तर अशा प्रशिक्षण संस्थांना MSSDS ची पुनःश्च संलग्नता घेणे आवश्यक नसून, सदर संस्था Deemed to be approved म्हणून ग्राह्य धरण्यात येत आहेत. कौशल्य प्रशिक्षण संस्थांना (Vocational Training Provider) NCVT/SSCs यांनी मान्यता दिलेल्या व्यवसाय अभ्यासक्रमाव्यतिरिक्त इतर अभ्यासक्रमांचे प्रशिक्षण देण्याचा पर्याय सहजरित्या उपलब्ध होत नसल्याने, औद्योगिक/सेवा/ व्यापार क्षेत्राच्या मागणीनुसार कौशल्याधारीत अभ्यासक्रम तयार करणे अथवा त्यामध्ये बदल करणे शक्य होत नाही. त्याचप्रमाणे NCVT/SSCs यांनी मान्यता दिलेल्या मूल्यमापन संस्था (Assessing Bodies) यांचेमार्फत उमेदवारांच्या कौशल्याचे प्रशिक्षणोत्तर मुल्यमापन करण्यात येत आहे. तथापि, सदर मुल्यमापन संस्थांची संख्या मर्यादित असल्याने राज्य पातळीवर मुल्यमापन संस्था/व्यक्ती यांचा Pool तयार करण्याचीही आवश्यकता आहे. राज्यातील कौशल्य विकास कार्यक्रमाच्या व्याप्तीचा विचार करता, कौशल्य विकास कार्यक्रमाच्या अंमलबजावणीच्या कार्यवाहीचे विकेंद्रीकरण करून सदर कार्यक्रम महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी व महाराष्ट्र राज्य व्यवसाय प्रशिक्षण परिषदेमार्फत राबविण्याचे शासनाचे धोरण आहे.

कौशल्य विकास व उद्योजकता विभागाच्या दिनांक १८/०१/२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये स्थापित करण्यात आलेल्या महाराष्ट्र राज्य व्यवसाय प्रशिक्षण परिषदेची (MSCVT) संस्था नोंदणी अधिनियम, १८६० अंतर्गत नोंदणी करण्यात आली आहे. औद्योगिक आस्थापनांना आवश्यक असणारे तंत्रकुशल मनुष्यबळ उपलब्ध होण्यासाठी मागणीनुरुप व्यवसाय अभ्यासक्रम (Demand Driven) तयार करणे, जेणेकरून उमेदवारांना रोजगार/स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध होतील हा परिषदेचा प्रमुख उद्देश आहे. या परिषदेमार्फत औद्योगिक/सेवा/व्यापार क्षेत्रातील आस्थापनांच्या मागणीनुसार नवीन कौशल्याधारीत व्यवसाय अभ्यासक्रमांना मान्यता दिल्यास, कुशल मनुष्यबळाची मागणी पुर्ण करण्यास निश्चितच मदत होणार आहे.

सबब, राज्यात विविध क्षेत्रामध्ये सर्वसमावेशक कौशल्य विकास कार्यक्रम राबविण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र राज्य व्यवसाय प्रशिक्षण परिषदेमार्फत व्यवसाय प्रशिक्षण संस्था (Vocational Training Institute - VTI) व कौशल्य चाचणी संस्था (Skill Assessment Agency - SAA) यांना संलग्नता देण्याबाबतच्या कार्यपध्दतीस मान्यता देण्याची बाब शासनाचे विचाराधीन होती.

## शासन निर्णय :

कौशल्य विकास कार्यक्रमाच्या प्रभावी व वेगवान अंमलबजावणीसाठी महाराष्ट्र राज्य व्यवसाय प्रशिक्षण परिषदेमार्फत (MSCVT) **व्यवसाय प्रशिक्षण संस्था** (Vocational Training Institute - VTI) व **कौशल्य चाचणी संस्था** (Skill Assessment Agency - SAA) यांना संलग्नता देण्याबाबतच्या **परिशिष्ट-१** मध्ये नमूद केलेल्या प्रमाणित कार्यपध्दतीस या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

२. महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी यांचेमार्फत सूचिबध्द करण्यात आलेल्या कौशल्य प्रशिक्षण संस्था (Skill Training Provider) व मूल्यमापन संस्था (Assessing Bodies) यापुढे अनुक्रमे व्यवसाय प्रशिक्षण संस्था (Vocational Training Institute - VTI) व कौशल्य चाचणी संस्था (Skill Assessment Agency - SAA) म्हणून संबोधण्यात येतील.

३. या शासन निर्णयान्वये मान्यता दिलेल्या प्रमाणित कार्यपध्दतीनुसार कौशल्य विकास कार्यक्रमातील सहभागधारकांना संलग्नता देण्याबाबतची कार्यवाही महाराष्ट्र राज्य व्यवसाय प्रशिक्षण परिषदेच्या सदस्य सचिवांनी तात्काळ करावी.

४. कौशल्य विकास व उद्योजकता विभागाचा दिनांक २३/११/२०१५ रोजीचा संदर्भाधीन शासन निर्णय या शासन निर्णयान्वये अधिक्रमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्रमांक २०१७१२२६१६०३१०४७०३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

S.G. Patil

Digitally signed by S.G. Patil
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=SDED, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=f64f9296da4ba15d02d3ad3826a21a74ed080355ac04eef5617c3b4f08af47ae, cn=S.G. Patil
Date: 2017.12.26 16:09:13 +05'30'

(सं.गि.पाटील)
उप सचिव, महाराष्ट्र राज्य

**प्रत,**

१. मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे सचिव,
२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव,
३. सर्व संबंधित मा. मंत्री, यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
४. सर्व संबंधित मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
५. मा. विरोधी पक्षनेता, विधानपरिषद/विधानसभा यांचे खाजगी सचिव, विधान भवन, मुंबई
६. सर्व विधानमंडळ सदस्य, महाराष्ट्र राज्य
७. मा. मुख्य सचिव यांचे उप सचिव, मुख्य सचिवांचे कार्यालय, मंत्रालय, मुंबई
८. सर्व मंत्रालयीन विभागाचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई
९. आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता संचालनालय, कोकण भवन, मुंबई
१०.मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी, मुंबई.
११.आयुक्त तथा नगर संचालक, नगर परिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई
१२.सर्व विभागीय आयुक्त,

१३.सर्व जिल्हाधिकारी,

१४.आयुक्त, सर्व महानगरपालिका,

१५.सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,

१६.मुख्याधिकारी, सर्व नगर परिषद/नगर पंचायती,

१७.संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

१८. सहसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय, मुंबई/पुणे/ नाशिक/ औरंगाबाद/अमरावती/नागपूर.

१९.सदस्य सचिव, महाराष्ट्र राज्य व्यवसाय प्रशिक्षण परिषद, मुंबई.

२०.उपसंचालक, विभागीय मुख्यालय कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता, मुंबई/पुणे/ नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर.

२१.सर्व कार्यासने, कौशल्य विकास व उद्योजकता विभाग, मंत्रालय, मुंबई.

२२.निवड नस्ती.

## कौशल्य विकास व उद्योजकता विभागाच्या शासन निर्णय क्रमांक कौविउ- २०१७/ प्र.क्र.२३७/अभियान-१, दिनांक २६ डिसेंबर, २०१७ सोबतचे परिशिष्ट-१

**महाराष्ट्र राज्य व्यवसाय प्रशिक्षण परिषदेमार्फत कौशल्याधारीत नवीन अभ्यासक्रमांना तसेच व्यवसाय प्रशिक्षण संस्था (Vocational Training Institute - VTI) व कौशल्य चाचणी संस्था (Skill Assessment Agency - SAA) यांना संलग्नता देण्याबाबतची कार्यपध्दती पुढीलप्रमाणे राहील.**

**अ) कौशल्याधारीत व्यवसाय अभ्यासक्रमांना महाराष्ट्र राज्य व्यवसाय प्रशिक्षण परिषदेची संलग्नता देण्याबाबतची कार्यपध्दती.**

१) प्रशिक्षण संस्था, औद्योगिक वा व्यावसायिक आस्थापना, व्यक्ती, परिषद इत्यादी स्वयंस्फूर्तीने त्यांच्या मागणीनुसार "**सहपत्र-अ**" मध्ये दिलेल्या नमुन्यात अभ्यासक्रम तयार करतील व परिषदेच्या संलग्नतेसाठी Online स्वरुपात सादर करतील.

२) अभ्यासक्रम संलग्नता शुल्क रु.१०,०००/- प्रति अभ्यासक्रम असे राहील. सदर शुल्क महाराष्ट्र राज्य व्यवसाय प्रशिक्षण परिषदेच्या बँक खात्यात Online स्वरुपात जमा करण्यात येईल.

३) व्यवसाय अभ्यासक्रमांना संलग्नता देण्यासाठी परिषद खालीलप्रमाणे विषय तज्ञांची उपसमिती गठीत करेल.

| | |
|---|---|
| ३.१. संबंधित क्षेत्रातील विषयतज्ञ | - १ अध्यक्ष |
| ३.२. संबंधित क्षेत्रातील विषयतज्ञ | - २ सदस्य |
| ३.३. औद्योगिक / व्यावसायिक आस्थापनेतील तज्ञ | - २ सदस्य |
| ३.४. अध्यक्ष / संचालक (व्य.शि.व प्र.) / सदस्य सचिव यांनी नामनिर्देशित केलेले अधिकारी | - १ सदस्य सचिव |

(संबंधित क्षेत्रातील विषयतज्ञ हे आवश्यक शैक्षणिक अर्हता व अनुभव धारण करणारे असावेत)

४) उक्त उपसमिती प्राप्त अभ्यासक्रमाची रोजगार व स्वयंरोजगारासाठी उपयुक्तता, कौशल्य विकास, प्रशिक्षण सुविधा, परीक्षा, प्रशिक्षण शुल्क, परिक्षा शुल्क इ. बाबत सविस्तर अभ्यास करुन आपला अहवाल संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांना सादर करतील.

५) संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय यांना उपसमितीने शिफारस केलेल्या व्यवसाय अभ्यासक्रमांना महाराष्ट्र राज्य व्यवसाय प्रशिक्षण परिषदेची संलग्नता देण्यासाठी प्राधिकृत करण्यात येत आहे.

६) परिषदेची संलग्नता असलेले सर्व अभ्यासक्रम परिषदेच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येतील.

७) व्यवसाय अभ्यासक्रमास संलग्नता प्राप्त झाल्यानंतर परिषदेचे सदस्य सचिव हे तत्संबधीचा सविस्तर अहवाल परिषदेच्या पुढील नियामक परिषदेच्या (Governing Council) व तद्नंतर सर्वसाधारण मंडळाच्या (General Body Meeting) बैठकीत सादर करतील.

८) अभ्यासक्रम संलग्नतेच्या शुल्कात वेळोवेळी बदल करण्याचे अधिकार नियामक परिषदेस (Governing Council) राहतील.

९) अभ्यासक्रम संलग्नतेसाठी गठित उपसमितीवरील शासकीय सभासद उपसमितीच्या बैठकीस हजर राहण्याकरिता नियमानुसार देय प्रवास व दैनिक भत्ता मिळण्यास पात्र राहतील. उपसमितीवरील अशासकीय सभासदांना उपसमितीच्या बैठकीकरीता हजर राहण्यासाठी मुंबई नागरी सेवा नियम खंड २ मधील परिशिष्ट ४२-ए, नियम १ मधील १ (एक)(बी) व वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक टिआरए/१४७७/१०३२/सी/एसईआर-५, दिनांक २३/०९/१९७७ व शासन निर्णय क्रमांक टिआरए/१०८३/१४२६/एसईआर-५, दिनांक ०१/०२/१९८४ मधील तरतुदींनुसार व शासन निर्णय क्रमांक आरपीएस/१२८८/(५६८)/सेवा-१०, दिनांक ०१/१०/१९८८ मधील परिशिष्ट-३ मध्ये विहित केलेल्या अथवा शासनाने वेळोवेळी सुधारित केलेल्या दर्जानुसार प्रवास व दैनिक भत्ता अनुज्ञेय राहील. तथापि, त्यांना विमान/रेल्वे (वातानुकूलीन प्रथम वर्ग)/वैयक्तिक वाहन यांनी केलेल्या प्रवास खर्चाची प्रतिपुर्ती अनुज्ञेय राहणार नाही.

१०) उपसमितीच्या प्रत्येक सदस्यांना उपसमितीच्या बैठकांना उपस्थित राहण्याकरिता रुपये ५००/- प्रतीदिन मानधन अनुज्ञेय राहील.

११) प्रवास व मानधनासाठी होणारा खर्च पूर्णपणे “महाराष्ट्र राज्य व्यवसाय प्रशिक्षण परिषद” च्या बँक खात्यात जमा असलेल्या रक्कमेतून भागविण्यात येईल.

१२) परिषदेंतर्गत नव्याने सुरु करावयाच्या व्यवसाय अभ्यासक्रमांना संलग्नता देत असतानाच खालील योजना/विभागाद्वारे मान्यता दिलेल्या व्यवसाय अभ्यासक्रमांना Deemed to be Approved Courses म्हणून संलग्नता देण्यात येईल. तथापि, सदर अभ्यासक्रम NSQF च्या स्तराशी सुसंगत असणे आवश्यक राहील.

    १२.१. National Skill Development Corporation (NSDC)
    १२.२. Sector Skill Councils (SSCs)
    १२.३. National Council of Vocational Training (NCVT)
    १२.४. Modular Employability Scheme (MES)

१२.५. महाराष्ट्र राज्य व्यवसाय शिक्षण परिक्षा मंडळ (MSBVE)

१२.६. Courses approved by appropriate Foreign Authority.

तथापि, संबंधित व्यवसाय प्रशिक्षण संस्थेस (Vocational Training Institute - VTI) उक्त व्यवसाय अभ्यासक्रमांचे प्रशिक्षण देण्यासाठी महाराष्ट्र राज्य व्यवसाय प्रशिक्षण परिषदेची पूर्वमान्यता घेणे क्रमप्राप्त राहील.

**ब) व्यवसाय प्रशिक्षण संस्था (Vocational Training Institute - VTI) व कौशल्य चाचणी संस्था (Skill Assessment Agency) यांना महाराष्ट्र राज्य व्यवसाय प्रशिक्षण परिषदेची संलग्नता देण्याबाबतची कार्यपध्दती खालीलप्रमाणे राहील.**

**१. प्रसिध्दी देणे :**

१) महाराष्ट्र राज्य व्यवसाय प्रशिक्षण परिषदेमार्फत संलग्नित व्यवसाय अभ्यासक्रम, व्यवसाय प्रशिक्षण संस्था (Vocational Training Institute - VTI) व कौशल्य चाचणी संस्था (Skill Assessment Agency) इत्यादीबाबत योग्यरित्या जाहिरात प्रसिध्द करण्यात येईल.

२) कौशल्य विकास व उद्योजकता विभागांतर्गत सर्व प्रादेशिक कार्यालये, जिल्हा कार्यालये, शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, शासकीय तांत्रिक विद्यालये, इ. मार्फतही प्रसिध्दी करण्यात येईल.

३) कार्यपध्दती, माहिती पुस्तिका, परिषदेने निर्गमित केलेले निकष/माहिती, परिषदेने संलग्नता दिलेले व्यवसाय अभ्यासक्रम इ. माहिती परिषदेच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येईल.

**२. अर्ज करणे:**

व्यवसाय प्रशिक्षण संस्था (Vocational Training Institute - VTI) व कौशल्य चाचणी संस्था (Skill Assessment Agency - SAA) यांना महाराष्ट्र राज्य व्यवसाय प्रशिक्षण परिषदेची संलग्नता देण्याबाबतची संपूर्ण प्रक्रिया Online असेल. अर्जदार परिषदेच्या संकेतस्थळावर ऑनलाइन स्वरुपात अर्ज करतील.

**३. व्यवसाय प्रशिक्षण संस्था व कौशल्य चाचणी संस्था यांच्या निवडीचे निकष :**

संस्था नोंदणी अधिनियम, १८६०/महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५०/Company Act, १९५६ वा इतर कायद्याअंतर्गत नोंदणी झालेले खाजगी/शासकीय/ निमशासकीय/शासकीय मालकीचे उपक्रम, भागिदारीतील/मर्यादित कारणास्तव

भागिदारीतील/एकमेव मालकी असलेल्या संस्था अथवा स्पेशल इकॉनॉमिक झोनचे प्रोमोटर्स (SEZ)

कौशल्य चाचणी करणाऱ्या तज्ञांची शैक्षणिक अर्हता व अनुभव निश्चित करण्यास परिषदेचे नियामक मंडळ (Governing council) सक्षम असेल. अर्जदारास पात्रतेच्या पृष्ठ्यर्थ आवश्यक ते दस्तऐवज ऑनलाईन अर्जासोबत Upload करणे क्रमप्राप्त राहील.

**४. व्यवसायाची निवड :**

४.१. Online अर्ज करतेवेळी अर्जदाराने व्यवसाय अभ्यासक्रमांची प्रशिक्षणासाठी वा कौशल्य चाचणीसाठी निवड करुन त्यांची ऑनलाईन नोंद करणे आवश्यक राहील.

४.२. व्यवसाय प्रशिक्षण संस्थेने तुकड्यांची निवड करताना संबंधित व्यवसाय अभ्यासक्रमांच्या तुकड्या किती पाळ्यात (Shift) चालविण्यात येणार आहे याचे योग्य नियोजन करावे. व्यवसाय प्रशिक्षण संस्था साधारणत: सकाळी ७.०० ते रात्री १०.०० या दरम्यान जास्तीत जास्त एकूण १५ तास कार्यरत राहतील ही बाब विचारात घेऊन तुकड्यांची संख्या निश्चित करावी.

**५. जागेचा मालकी हक्क:**

संस्था ज्या जागेत सुरु करावयाची आहे त्याकरिता खालील कागदपत्रे/दस्तऐवज ऑनलाइन अर्जासोबत Upload करणे आवश्यक राहील.

५.१. जागा स्वत:च्या मालकीची असल्यास मालकी हक्काबाबतचे पुरावे जसे की, ६ महिन्याच्या आतील ७/१२ उतारा / मालमत्ता दस्ताऐवज/ मालमत्ता पत्रक इ.

५.२. जागा भाडेतत्वावर संपादित केली असल्यास दुय्यम निबंधकाकडे किमान ३ वर्षे कालावधीकरिता नोंदणीकृत केलेल्या भाडे करारपत्राची प्रत. (Registered Lease Deed)

५.३. बांधकाम पूर्ण असल्यास सक्षम प्राधिकाऱ्याने/यंत्रणेने मंजूर केलेला व आर्किटेक्टने साक्षांकीत केलेला नकाशा व सक्षम प्राधिकाऱ्यांचा बांधकाम पुर्णत्वाचा दाखला.

**६. आर्थिक क्षमता :**

व्यवसाय प्रशिक्षण संस्था (VTI) यांना प्रशिक्षणासाठी, बांधकाम व यंत्रसामुग्रीमध्ये दिर्घ मुदतीची गुंतवणुक करणे आवश्यक असते. सबब, अर्जदाराकडे खालीलप्रमाणे आर्थिक क्षमता असणे आवश्यक राहील.

| अ. क्र. | तपशील | आर्थिक क्षमता प्रति व्यवसाय प्रति तुकडी |
|---|---|---|
| १ | इमारत व यंत्रसामुग्री/हत्यारे उपलब्ध नसल्यास | रु. ४.०० लक्ष |
| २ | फक्त मानांकनाप्रमाणे इमारत पूर्ण असल्यास वा भाडे करार झाला असल्यास | रु. २.५० लक्ष |
| ३ | फक्त मानांकनाप्रमाणे यंत्रसामुग्री/हत्यारे असल्यास तथापि इमारत पूर्ण नसल्यास वा भाडे करार झाला नसल्यास | रु. २.५० लक्ष |
| ४ | मानांकनाप्रमाणे पायाभूत व प्रशिक्षण सुविधा उपलब्ध असल्यास | रु. १.०० लक्ष |

कौशल्य चाचणी संस्था (SAA) यांची आर्थिक क्षमता निश्चित करण्यास परिषदेचे नियामक मंडळ (Governing council) सक्षम असेल.

६.१. यंत्रसामुग्री/हत्यारे उपलब्ध असल्यास त्यासंबंधी पुरावा जसे की, खरेदी पावत्या, दान प्रमाणपत्र इ. ऑनलाईन स्वरुपात Upload करणे आवश्यक राहील.

६.२. अर्जदाराने त्याच्या बँक खात्यामध्ये अथवा फिक्स डिपॉजिट (FD) च्या स्वरुपात विहित निधी जमा असल्याबाबतचे दस्तऐवज (उदा. अर्जाच्या दिनांकापासून मागील ७ दिवसां-पर्यंतचे बँक स्टेटमेंट इत्यादी) ऑनलाईन स्वरुपात Upload करणे आवश्यक राहील.

## ७. अर्ज प्रक्रिया व नोंदणी शुल्क :

७.१. Online अर्ज करतेवेळी खालीलप्रमाणे शुल्क आकारण्यात येईल.

| अ.क्र. | तपशिल | व्यवसाय प्रशिक्षण संस्था | कौशल्य चाचणी संस्था |
|---|---|---|---|
| १ | अर्ज प्रक्रिया शुल्क | रु. २,०००/- | रु. २,०००/- |
| २ | नोंदणी शुल्क | रु. १०,०००/- प्रति व्यवसाय प्रति तुकडी | रु. १०,०००/- प्रति व्यवसाय |
| ३ | अनामत रक्कम | रु. २५,०००/- प्रति व्यवसाय प्रति तुकडी | रु. २५,०००/- प्रति व्यवसाय |
| ४ | संलग्नता आदेश नुतनीकरण शुल्क | रु. ५,०००/- प्रति व्यवसाय प्रति तुकडी | रु. ५,०००/- प्रति व्यवसाय |
| ५ | पुन:श्च अर्ज नोंदणी शुल्क | रु. ५,०००/- प्रति व्यवसाय प्रति तुकडी | रु. ५,०००/- प्रति व्यवसाय |

७.२. उपरोक्त शुल्कामध्ये बदल करण्याचे अधिकार परिषदेच्या नियामक मंडळास (Governing Council) राहतील.

७.३. शुल्कापोटी जमा झालेला निधी खालील बाबींवर खर्च करण्यात येईल.

७.३.१. जाहिरात व प्रसिध्दी

७.३.२. मान्यता व संलग्नतेची कार्यपध्दती संपूर्णपणे ऑनलाईन करणेसाठी संगणक प्रणाली विकसित करणे व देखभाल करणे.

७.३.३. निरीक्षण समितीसाठी प्रवास/दैनिक भत्ता व मानधन.

७.३.४. नियामक मंडळाने मान्यता दिलेले इतर खर्च.

## ८. हमीपत्र :

संस्थेने रु.१००/- च्या Non Judicial Stamp Paper वर "**सहपत्र-ब**" मध्ये देण्यात आलेल्या नमुन्यातील हमीपत्र ऑनलाईन प्रणालीव्दारे अपलोड करणे आवश्यक राहील.

## ९. संस्थेचा ठराव :

अर्जदार सोसायटी/ट्रस्ट/कंपनी ॲक्ट अंतर्गत नोंदणी झालेले खाजगी/शासनाचे उपक्रम/स्पेशल इकॉनॉमिक झोनचे प्रोमोटर्स (SEZ) असल्यास, व्यवसाय प्रशिक्षण संस्था (VTI)/कौशल्य चाचणी संस्था (SAA) सुरू करण्यासंबंधी व्यवस्थापनेचा ठराव ऑनलाईन अपलोड करण्यात येईल.

## १०. प्राथमिक पडताळणी (Primary Verification) :

१०.१. संबधित अर्जदार परिषदेच्या संकेतस्थळावर अर्ज करत असतानाच अर्जासोबत पात्रतेचे पृष्ठ्यर्थ आवश्यक असलेले दस्तऐवज/कागदपत्रे ऑनलाईन स्वरुपात अपलोड करतील. तसेच आवश्यक अर्ज प्रक्रिया शुल्क व नोंदणी शुल्क जमा करतील.

१०.२. अर्जदाराने सर्व माहिती परिपूर्ण भरल्याची व आवश्यक सर्व कागदपत्रे/ दस्तऐवज अपलोड केल्याची खात्री ऑनलाईन संगणकीय प्रणालीमार्फत करण्यात येईल व अर्जदारास आपला अर्ज हमीपत्र (Undertaking) मान्य करुन Online Submit करता येईल.

१०.३. सदर हमीपत्राव्दारे अर्जदाराने सादर केलेली माहिती, कागदपत्रे व दस्तऐवज बरोबर व परिपूर्ण असल्याची खात्री केली असल्याचे प्रमाणित करण्याची तरतूद तसेच प्रत्यक्ष निरीक्षणाच्या वेळी अर्जदाराने सादर केलेल्या माहिती, कागदपत्रे व दस्तऐवज यामध्ये तफावत आढळल्यास अर्जदारावर अर्ज बाद होणे, शुल्क जप्त होणे इत्यादी कायदेशीर कार्यवाही करण्याची तरतूद संबंधित अर्जदारास मान्य असल्याचे हमीपत्रात नमूद असेल.

१०.४. अर्जदाराने अर्ज Online स्वरुपात हमीपत्र मान्य करुन Submit केल्यानंतर अर्ज Freeze होईल व सदर अर्जात कोणत्याही प्रकारे बदल करता येणार नाही.

१०.५. Online संगणकीय प्रणालीमार्फतच अर्जदारास प्रत्यक्ष निरीक्षणासाठी पायाभूत/ प्रशिक्षण सुविधांची उपलब्धता करण्याबाबत कळविण्यात येईल.

१०.६. Online स्वरूपात अर्ज Submit करतांना व्यवसाय प्रशिक्षण/कौशल्य चाचणीकरिता विहित मानकानुसार पायाभूत व प्रशिक्षण सुविधा उपलब्ध नसल्यास संबंधित संस्थेने Online स्वरूपात अर्ज Submit केल्यापासून १ वर्षाच्या आत सदर सुविधा उपलब्ध करुन प्रत्यक्ष निरीक्षणास तयार असल्याबाबत परिषदेस ऑनलाईन स्वरुपात कळविणे आवश्यक राहील.

**११. प्रत्यक्ष निरीक्षण (Physical Verification) :**

११.१. प्रत्यक्ष निरीक्षणाकरीता संगणकीय प्रणालीव्दारे संबंधित परिषदेशी संलग्नित निरीक्षण संस्थांपैकी (Inspecting Agency) एक निरीक्षण संस्था निर्धारित करण्यात येऊन त्यानुसार संबंधित अर्जदारास व निरीक्षण संस्थेस सूचित करण्यात येईल.

११.२. निरीक्षण संस्थेने ४८ तासांच्या आत निरीक्षणाकरीता ऑनलाईन निरीक्षण स्विकृती (Online Acceptance of Inspection) सादर करणे आवश्यक राहील अन्यथा संगणक प्रणालीद्वारे निरीक्षणाकरिता अन्य निरीक्षण संस्थेची निवड करण्यात येईल.

११.३. निरीक्षण संस्था संगणकीय प्रणालीव्दारे ऑनलाईन निरीक्षण स्विकृती सादर करताना निरीक्षणाची तारीखसुध्दा निर्धारीत करतील.

११.४. नियुक्त निरीक्षण संस्थेने निर्धारीत दिनांकास प्रत्यक्ष निरिक्षण करणे आवश्यक राहील.

११.५. अर्जदाराने Online अर्जात सादर केलेली माहिती व अपलोड केलेली कागदपत्रे/ दस्तऐवज बरोबर व परिपूर्ण असल्याची निरीक्षण संस्था खात्री करेल.

११.६. अर्जदाराने अर्जात केलेला तपशिल व व्यवसाय प्रशिक्षण/कौशल्य चाचणीसाठी उभारलेल्या सुविधा ह्या परिषदेने निर्धारित केलेल्या मानकांप्रमाणे असल्याबाबत निरीक्षण संस्थेद्वारे काटेकोरपणे तपासण्यात येतील.

११.७. निरीक्षण संस्थेने निरीक्षण पूर्ण केल्यानंतर ४८ तासांच्या आत निरीक्षण अहवाल आपल्या अभिप्राय व फोटोंसह संगणकीय प्रणालीवर कळविणे आवश्यक राहील.

११.८. सदर निरीक्षण अहवालाच्या आधारे संगणकीय प्रणालीद्वारे संस्थेस स्विकृती प्रमाणपत्र (Letter of Acceptance) किंवा नकार प्रमाणपत्र (Letter of Rejection) निर्गमित करण्यात येईल.

११.९. निरीक्षण केलेल्या संस्थांपैकी १०% संस्थांची संगणकीय प्रणालीव्दारे निवड करण्यात येऊन परिषदेमार्फत संबंधित संस्थांचे पुन:निरीक्षण करण्यात येईल. तथापि, अशा

पुन:निरीक्षणाकरिता अर्जदाराकडून कोणतेही अतिरीक्त शुल्क आकारण्यात येणार नाही.

११.१०. नकार प्रमाणपत्र (Letter of Rejection) प्राप्त संस्था परिषदेकडे १५ दिवसांच्या आत अपिल करू शकतील. अशा संस्थांचे पुन:निरीक्षण करणेसंबंधी परिषद निर्णय घेईल.

११.११. निरीक्षण संस्थेस रु.३,०००/- प्रति व्यवसाय किंवा एकूण रु.५,०००/- यापैकी जी रक्कम अधिक असेल इतके मानधन अनुज्ञेय असेल. सदर मानधनामध्ये बदल करण्याचे अधिकार परिषदेच्या नियामक मंडळास राहतील. मानधनावरील खर्च परिषदेच्या बँक खात्यात जमा असलेल्या रक्कमेतून भागविण्यात येईल.

**१२. संलग्नता आदेश (Affiliation Order) व वैधता :**

१२.१. कागदपत्रांची प्राथमिक पडताळणी व प्रत्यक्ष निरीक्षण अहवालाच्या आधारे स्विकृती प्रमाणपत्रप्राप्त (Letter of Acceptance) अर्जदार संस्थेस संगणकीय प्रणालीमार्फतच महाराष्ट्र राज्य व्यवसाय प्रशिक्षण परिषदेची (MSCVT) संलग्नता देण्यात येईल.

१२.२. सर्व संलग्नताप्राप्त संस्थांची माहिती नियामक परिषदेस (Governing Council) व सर्वसाधारण मंडळास (General Body) पुढील बैठकीत सादर करण्यात येईल.

१२.३. संलग्नता आदेश हे निर्गमित झालेल्या दिनांकापासून प्रथम ३ वर्षांसाठी वैध राहतील.

१२.४. संलग्नता आदेशांची ०३ वर्षाची वैधता संपल्यानंतर प्रत्येक ५ वर्षानी ऑनलाईन प्रणालीव्दारे त्यांचे नुतनीकरण करणे बंधनकारक राहील. नुतनीकरणासाठी निरीक्षण संस्थेमार्फत निरीक्षण करण्यात येईल व तद्नंतर संलग्नता आदेशाचे नुतनीकरण करण्यात येईल.

**१३. अनामत रक्कम जमा करणे :**

ज्या संस्थेस **परिषदेमार्फत** संलग्नता देण्यात येईल अशा संस्थेने “महाराष्ट्र राज्य व्यवसाय प्रशिक्षण परिषद (MSCVT)” च्या बँक खात्यात विहित अनामत रक्कम जमा करणे आवश्यक राहील.

**१४. प्रत्यक्ष प्रवेशास पात्र :**

ज्या व्यवसाय अभ्यासक्रमांच्या तुकड्यास परिषदेची संलग्नता प्राप्त आहे व त्यासाठी विहित अनामत रक्कम भरण्यात आली, त्या व्यवसाय अभ्यासक्रमाच्या तुकड्या प्रत्यक्षात प्रवेशास पात्र ठरतील व पुढील प्रवेश सत्रात त्या तुकड्यांत प्रवेश करण्यात येतील.

## १५. नाकारलेल्या अर्जांवरील कार्यवाही (Letter of Rejection) :

१५.१. कागदपत्राच्या प्राथमिक छाननी व/वा प्रत्यक्ष निरीक्षणात नाकारलेले अर्ज (Letter of Rejection) एक वर्ष कालावधीकरीता ग्राह्य धरण्यात येतील. यासाठी अर्जदारास पुन:श्च विहित केलेले अर्ज नोंदणी शुल्क भरुन त्यांनी यापूर्वी सादर केलेला ऑनलाईन स्वरुपातील अर्ज पुन:श्च ग्राह्य धरण्यासाठी विनंती करावी लागेल. (Request for Reconsideration)

१५.२. पुर्वीच्या अर्जातील व्यवसाय/तुकड्यांव्यतिरिक्त इतर व्यवसाय तुकड्यांसाठी विहित केलेले अर्ज प्रक्रिया शुल्क व नोंदणी शुल्क भरावे लागेल.

१५.३. परिषद स्तरावर तसेच निरीक्षण संस्थेने नाकारलेले प्रस्ताव त्रुटींची पुर्तता करून विहित मुदतीत सादर करण्यात न आल्यास सदरचे प्रस्ताव बाद ठरविण्यात येतील.

१५.४. उक्त प्रमाणे बाद ठरविण्यात आलेल्या अर्जावर कुठल्याही प्रकारची पुन:श्च कार्यवाही करण्यात येणार नाही अथवा त्रुटी कळवून त्याची पूर्तता करुन घेण्यात येणार नाही. सदर अर्ज रद्दबादल ठरवून दप्तरी दाखल करण्यात येईल. तसेच या अर्जांकरीता भरलेले अर्ज प्रक्रिया शुल्क व नोंदणी शुल्क फक्त त्या अर्जापुरतेच मर्यादित असल्याने ते संस्थेस परत मिळणार नाही अथवा पुढील वर्षाकरीता लागू राहणार नाही. तद्नंतर अर्ज करतेवेळी नियमानुसार अर्ज करणे आवश्यक असून सर्व सहपत्रे व शुल्कांचा भरणा नव्याने करणे आवश्यक राहील.

## १६. संलग्नता देण्यासाठी कालमर्यादा:

| अ.क्र. | प्रक्रिया टप्पा | महत्तम कालावधी |
|---|---|---|
| १ | विहित शुल्कासह अर्ज संपूर्णपणे भरुन Online स्वरुपात Submit करणे | T१ |
| २ | प्राथमिक पडताळणी व प्राथमिक पडताळणीत पात्र ठरणाऱ्या अर्जदार संस्थेस कळविणे | T१ |
| ३ | अर्जदार संस्थेने व्यवसाय प्रशिक्षण/कौशल्य चाचणी सुविधा तयार करुन प्रत्यक्ष निरीक्षणास तयार असल्याबाबत परिषदेस ऑनलाईन स्वरुपात कळविणे | T२ = T१ + ३६५ |
| ४ | प्रत्यक्ष निरीक्षण | T२ + ३० |
| ५ | परिषदेस निरिक्षक अहवाल पाठविणे | T२+३२ |
| ६ | संस्थेस स्विकृती प्रमाणपत्र (Letter of Acceptance) किंवा नकार प्रमाणपत्र (Letter of Rejection)पाठविणे. | T = T२ + ३५ |
| ७ | नकार प्रमाणपत्र (Letter of Rejection) प्राप्त संस्थेने परिषदेकडे पुन: निरीक्षणासाठी अपिल करणे | T + १५ |
| ८ | संलग्नता आदेश | T + २० |

| अ.क्र. | प्रक्रिया टप्पा | महत्तम कालावधी |
|---|---|---|
| ९ | अनामत रक्कम जमा करणे व प्रत्यक्ष प्रवेशास पात्र | T + ४५ |
| १० | पुन:श्च अर्ज नोंदणी शुल्क भरुन अर्ज ग्राह्य धरण्यास विनंती | T + ३६५ |
| ११ | संलग्नतेची प्रथम वैधता | T + १०९५ |

**१७. प्रवेश पध्दती व प्रशिक्षण शुल्क :**

१७.१. प्रवेशोच्छूक सर्व उमेदवार प्रवेश संकेतस्थळावर नोंद करतील व व्यवसाय प्रशिक्षण संस्थानिहाय विकल्प व प्राधान्य तसेच प्रवेश अर्ज शुल्क रु. १५०/- ऑनलाईन स्वरुपात सादर करतील. प्रवेश अर्ज शुल्कामध्ये बदल करण्याचे अधिकार परिषदेच्या नियामक मंडळास (Governing Council) राहतील.

१७.२. सर्व व्यवसाय प्रशिक्षण संस्थांमधील प्रवेश केंद्रीय ऑनलाईन पध्दतीने करण्यात येतील.

१७.३. सदर व्यवसाय प्रशिक्षण संस्थांमार्फत प्रवेशित प्रशिक्षणार्थ्यांकडून नियामक परिषदेने निश्चित केलेले शुल्कच आकारण्यात येणार असल्याने सर्व प्रवेश हे गुणवत्तेवर ( Entry Level Qualification) आधारीत असतील.

१७.४. पात्र उमेदवारांना संकेतस्थळामार्फत ऑनलाईन प्रवेश (Allotment) देण्यात येईल. प्रवेश मिळालेल्या उमेदवारांच्या कागदपत्रांची प्रत्यक्ष तपासणी करण्याकरिता उमेदवाराने संबंधित व्यवसाय प्रशिक्षण संस्थेत व्यक्तिश: उपस्थित राहणे आवश्यक राहील. उमेदवारांचा प्रवेश निश्चित केल्याबाबत संबंधित व्यवसाय प्रशिक्षण संस्थेने ऑनलाईन स्वरूपात परिषदेस कळविल्यानंतर उमेदवार विहित प्रशिक्षण शुल्क महाराष्ट्र राज्य व्यवसाय प्रशिक्षण संस्थेच्या खात्यामध्ये थेट जमा करू शकेल. प्रशिक्षण शुल्क, उमेदवाराने शुल्क जमा करावयाचे टप्पे, इत्यादी बाबी निश्चित करण्याचे अधिकार परिषदेच्या नियामक मंडळास राहतील.

१७.५. प्रवेश नियमावली, अभ्यासक्रमनिहाय व्यवसाय प्रशिक्षण संस्थांची यादी, अभ्यासक्रमनिहाय व व्यवसाय प्रशिक्षण संस्थानिहाय प्रशिक्षण शुल्क, प्रवेश वेळापत्रक, प्रवेशासाठी पात्रता इ. बाबतची सविस्तर माहिती परिषदेच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध राहील.

१७.६. प्रवेश वेळापत्रकास राज्यातील सर्वाधिक खपाच्या वर्तमानपत्रांमध्ये प्रसिध्दी देण्यात येईल.

१७.७. व्यवसाय प्रशिक्षण संस्थेत प्रवेश निश्चित केलेल्या उमेदवारांचे प्रशिक्षण शुल्क हे संबंधित व्यवसाय प्रशिक्षण संस्थेस महाराष्ट्र राज्य व्यवसाय प्रशिक्षण संस्थेच्या संकेतस्थळावरुन तीन कार्यालयीन दिवसांच्या आत (शुल्क जमा झाल्याच्या दिनाकांपासून) Automated

स्वरुपात Electronics Clearing च्या माध्यमातून वर्ग करण्यात येईल. संस्थेमार्फत प्रवेशित उमेदवारांकडून कोणत्याही प्रकारे प्रशिक्षण शुल्क जमा करुन घेता येणार नाही.

**१८. अवैध प्रवेश :**

महाराष्ट्र राज्य व्यवसाय प्रशिक्षण परिषदेची (MSCVT)संलग्नता नसताना व/वा प्रवेशास परवानगी नसताना केलेले प्रवेश तसेच वरील मुद्दा क्र. १० मध्ये नमुद प्रवेश पध्दती व्यतिरिक्त केलेले प्रवेश हे अवैध प्रवेश समजण्यात येतील व सदर संस्थेवर सन २०१३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० "महाराष्ट्र राज्यात कृषी, पशु व मत्स्यविज्ञान, आरोग्यविज्ञान, उच्च, तंत्र व व्यवसाय शिक्षण यांमधील अनधिकृत संस्था स्थापन करण्यास आणि अनधिकृत अभ्यास पाठ्यक्रम सुरू करण्यास मनाई करण्याकरिता व तत्संबंधित किंवा तदनुषांगिक बाबींकरिता तरतूद करण्यासाठी अधिनियम" मधील तरतुदींनुसार कार्यवाही करण्यात येईल.

**१९. प्रशिक्षण:**

१९.१. व्यवसाय प्रशिक्षण संस्थांमध्ये प्रवेश झाल्यानंतर संबंधित व्यवसाय अभ्यासक्रमाचे प्रशिक्षण सुरू करण्यात येईल.

१९.२. प्रशिक्षणादरम्यान अभ्यासक्रमाप्रमाणे सैध्दांतिक, प्रात्यक्षिक, On the Job Training, Project Work, इ. आयोजित करण्यात येईल.

१९.३. प्रशिक्षणादरम्यान प्रशिक्षणार्थ्यांची हजेरी परिषदेच्या नियामक मंडळाने (Governing Council) ठरवुन दिलेल्या पध्दतीने नोंदवावी लागेल. कौशल्य चाचणीस पात्र होण्यासाठी प्रशिक्षणार्थ्यांची प्रशिक्षण वर्गामधील न्युनतम उपस्थिती असणे अनिवार्य राहील. सदर न्युनतम उपस्थिती निश्चित करण्याचे अधिकार परिषदेच्या नियामक मंडळास रहातील.

१९.४. व्यवसाय अभ्यासक्रमांचे प्रशिक्षण हे परिषदेने विहित केलेल्या कालावधीत तसेच वेळापत्रकानुसार पूर्ण करणे आवश्यक राहील.

१९.५. प्रशिक्षण पूर्ण होण्याच्या १५ दिवस आगोदर कौशल्य चाचणी शुल्क परिषदेच्या खात्यात ऑनलाईन स्वरुपात जमा करावे लागेल व कौशल्य चाचणी घेण्यासंबंधी ऑनलाईन विनंती नोंदवावी लागेल.

१९.६. **प्रशिक्षणार्थ्यांकडून आकारण्यात येणारे कौशल्य चाचणी शुल्क:**

| | | |
|---|---|---|
| एक किंवा एक वर्षापेक्षा अधिक कालावधीचे व्यवसाय अभ्यासक्रम | : | रु. ६५०/- |
| एक वर्षापेक्षा कमी कालावधीचे व्यवसाय अभ्यासक्रम | : | रु. ५००/- |

१९.७. वरील कौशल्य चाचणी शुल्कात बदल करण्याचे अधिकार परिषदेच्या नियामक मंडळास (Governing Council) राहतील.

## २०. कौशल्य चाचणी:

२०.१. कौशल्य चाचणी शुल्क विहित कालावधीमध्ये जमा झाले असल्यास, विहित वेळापत्रकानुसार प्रशिक्षण पूर्ण झाल्याच्या दिनांकापासून कमाल ७ दिवसांत कौशल्य चाचणी घेणे बंधनकारक असेल.

२०.२. महाराष्ट्र राज्य व्यवसाय प्रशिक्षण परिषदेकडे संलग्न असलेल्या कौशल्य चाचणी संस्थेमार्फत संबंधित व्यवसाय अभ्यासक्रम पूर्ण करणाऱ्या प्रशिक्षणार्थ्यांची कौशल्य चाचणी घेण्यात येईल.

२०.३. कौशल्य चाचणीचा निकाल संबंधित कौशल्य चाचणी संस्थेमार्फत २४ तासांच्या आत परिषदेच्या अधिकृत संकेतस्थळावर अपलोड करण्यात येईल.

२०.४. कौशल्य चाचणी संस्थेस प्रति उमेदवार मानधन खालीलप्रमाणे अनुज्ञेय राहील.

२०.४.१. एक किंवा एक वर्षापेक्षा अधिक कालावधीचे व्यवसाय अभ्यासक्रम - रु. ३००/-
२०.४.२. एक वर्षापेक्षा कमी कालावधीचे व्यवसाय अभ्यासक्रम - रु. २००/-

२०.५. कौशल्य चाचणी संस्थेस देय मानधनातूनच परिक्षकांचा प्रवास खर्च, मानधन, लेखन/ संगणकीय खर्च व इतर तद्नुषंगिक खर्च भागविणे अपेक्षित आहे. कौशल्य चाचणी संस्था कोणत्याही प्रकारे व/वा कोणत्याही मार्गाने व्यवसाय प्रशिक्षण संस्थेकडून रोख रक्कम व/वा अन्य स्वरूपात मानधन, शुल्क, भेटवस्तू, प्रतिपूर्ती, इत्यादींची/चा मागणी/स्विकार करणार नाही. असे करताना आढळल्यास व सिध्द झाल्यास संबंधित कौशल्य चाचणी संस्थेची संलग्नता रद्द करण्यात येईल. तसेच संबंधित संस्थेने परिषदेकडे जमा केलेली अनामत रक्कम जप्त करण्यात येऊन त्यांना काळ्या यादीत टाकण्यात येईल.

२०.६. व्यवसाय प्रशिक्षण संस्थेस प्रति प्रशिक्षणार्थी प्रात्यक्षिक परिक्षेकरीता कच्च्या मालासाठी होणाऱ्या खर्चाची प्रतिपुर्ती व्यवसाय अभ्यासक्रमांच्या कालावधीनुसार खालीलप्रमाणे करण्यात येईल.

२०.६.१. एक किंवा एक वर्षापेक्षा अधिक कालावधीचे व्यवसाय अभ्यासक्रम : रु. १००/- ते रु. २००/-
२०.६.२. एक वर्षापेक्षा कमी कालावधीचे व्यवसाय अभ्यासक्रम : रु. १००/- ते रु. २००/-

२०.७. व्यवसाय प्रशिक्षण संस्था कोणत्याही प्रकारे व/वा कोणत्याही मार्गाने प्रशिक्षणार्थ्यांकडून रोख रक्कम व/वा अन्य स्वरूपात मानधन, शुल्क, भेटवस्तू, प्रतिपूर्ती इ. मागणी/

स्विकार करणार नाही. असे करतांना आढळल्यास व सिध्द झाल्यास संबंधीत व्यवसाय प्रशिक्षण संस्थेची संलग्नता रद्द करण्यात येईल. तसेच संबंधित संस्थेने परिषदेकडे जमा केलेली अनामत रक्कम जप्त करण्यात येवून त्यांना काळ्या यादीत टाकण्यात येईल.

२०.८. केंद्र/राज्य शासनामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांसाठी व/वा अन्य संस्थांमार्फत राबविण्यात येणाऱ्या व्यवसाय अभ्यासक्रमांच्या कौशल्य चाचणीसाठी संबंधितांनी निर्देशीत केल्यानुसार कौशल्य चाचणी शुल्क आकारण्यात येईल. तसेच कौशल्य चाचणी संस्थेस अनुज्ञेय मानधन व व्यवसाय प्रशिक्षण संस्थेस कच्च्या मालासाठी देय रक्कम अनुक्रमे परिच्छेद क्रमांक २०.४ व २०.६ नुसार देय रक्कमेच्या प्रमाणात (Proportionate) असेल.

२०.९. कौशल्य चाचणी संस्थेस देय मानधन व व्यवसाय प्रशिक्षण संस्थेस कच्च्या मालासाठी देय रक्कम यामध्ये बदल करण्याचे अधिकार नियामक परिषदेस (Governing Council ) राहतील.

## २१. प्रमाणपत्र :

२१.१. कौशल्य चाचणीत उत्तीर्ण झालेल्या प्रशिक्षणार्थ्याचे प्रमाणपत्र संबंधित व्यवसाय प्रशिक्षण संस्थेस परिषदेमार्फत १५ दिवसांच्या आत पाठविण्यात येईल. तसेच विदेशी व्यवसाय अभ्यासक्रमांबाबत संबंधित विदेशी संस्था प्रमाणपत्र देतील.

२१.२. प्रमाणपत्रासाठी कोणतेही अतिरिक्त शुल्क आकारण्यात येणार नाही.

## २२. अनुत्तीर्ण प्रशिक्षणार्थ्यांची पुन: कौशल्य चाचणी:

२२.१. अनुत्तीर्ण प्रशिक्षणार्थ्याना कौशल्य चाचणी उत्तीर्ण होण्यासाठी सलग ३ संधी देण्यात येतील. या तीन संधीत प्रशिक्षणार्थी कौशल्य चाचणी उत्तीर्ण न झाल्यास प्रशिक्षणार्थ्यास पुन:श्च व्यवसाय अभ्यासक्रमास प्रवेश घ्यावा लागेल.

२२.२. प्रशिक्षणार्थ्यांने परिषदेस ऑनलाईन स्वरूपात पुन:कौशल्य चाचणी शुल्क खालीलप्रमाणे अदा करणे आवश्यक राहील.

२२.२.१. एक किंवा एक वर्षापेक्षा अधिक कालावधीचे व्यवसाय अभ्यासक्रम रु. ६५०/-

२२.२.२. एक वर्षापेक्षा कमी कालावधीचे व्यवसाय अभ्यासक्रम रु. ५००/-

२२.३. कौशल्य चाचणी संस्थेस देय मानधन व व्यवसाय प्रशिक्षण संस्थेस कच्च्या मालासाठी अनुक्रमे परिच्छेद क्रमांक क्र. २०.४ व २०.६ नुसार रक्कम अनुज्ञेय राहील.

२२.४. अनुत्तीर्ण प्रशिक्षणार्थ्यांची पुन:कौशल्य चाचणी ही नियमित तुकडीच्या कौशल्य चाचणीच्या वेळापत्रकानुसारच घेण्यात येईल.

२२.५. सदर पुन:कौशल्य चाचणीचे वेळापत्रक प्रशिक्षणार्थ्यांना संबंधित व्यवसाय प्रशिक्षण संस्थेने कळविणे आवश्यक राहील.

**२३. परिषदेचा जमा/खर्च :**

सर्व प्रकारचे शुल्क व अनामत रक्कम परिषदेच्या बँक खात्यात जमा करण्यात येऊन, त्यामधूनच परिषदेमार्फत खर्च भागविण्यात येईल.

**२४. महाराष्ट्र राज्य व्यवसाय प्रशिक्षण परिषदेच्या नियामक मंडळाची (Governing Council) कार्यकक्षा खालीलप्रमाणे असेल :**

२४.१. स्थानिक औद्योगिक आस्थापनांच्या गरजेनुसार जिल्ह्यातील औद्योगिक/सेवा/व्यापार इत्यादीं क्षेत्रातील आस्थापनांना आवश्यक असणाऱ्या कौशल्ययुक्त मनुष्यबळाची निश्चिती करणे.

२४.२. जिल्हा/क्षेत्रनिहाय (Sector) पुढील पाच वर्षाचा मनुष्यबळ विकासाचा बृहद् आराखडा (Master Plan) तयार करणे/मान्यता देणे. जिल्हयाचा बृहद् आराखडा तयार होईपर्यंत केंद्र वा राज्य शासनाने तयार केलेल्या मनुष्यबळ विकासाच्या बृहद् आराखड्यानुसार नियोजन करण्यात यावे.

२४.३. जिल्हयाच्या बृहद् आराखडयानुसार (Master Plan) निश्चित केलेल्या क्षेत्रामधील व्यवसायांपैकी एकाच व्यवसायासाठी ११०% मर्यादेपेक्षा (Upper Limit of seats) अधिक मागणी आल्यास त्या संदर्भात निर्णय घेणे.

२४.४. व्यवसाय प्रशिक्षण संस्था (VTI) व कौशल्य चाचणी संस्था (SAA) यांना नव्याने संलग्नता/ पुन:संलग्नता देणे किंवा त्यांचा विस्तार करण्यास मान्यता देण्याच्या दृष्टीने प्रत्यक्ष निरीक्षण करणेसाठी निरीक्षण संस्थांची (Inspecting Agency) निवड व नियुक्ती करणे.

२४.५. व्यवसाय प्रशिक्षण संस्थांमार्फत व्यवसाय अभ्यासक्रमाच्या प्रशिक्षणासाठी आकारण्यात येणारे अधिकतम प्रशिक्षण शुल्क निश्चित करणे. तसेच अर्ज प्रक्रिया शुल्क, नोंदणी शुल्क, अनामत रक्कम, संलग्नता आदेश नुतनीकरण शुल्क, पुन:श्च अर्ज नोंदणी शुल्क, कौशल्य चाचणी शुल्क यामध्ये बदल करण्याचे अधिकार राहतील.

२४.६. राज्यातील व्यवसाय प्रशिक्षणामध्ये गुणात्मक व सांख्यिकी वाढ करण्यासाठी Control - Coordinate - Cooperate - Information (C3I) ची भुमिका पार पाडणे.

************************

## सहपत्र –“अ”

## ANNEXURE-A
## COURSES UNDER MSCVT

1. Name of Trade/ Course: *(Name shall be on basis of Job Role)*
2. Duration of Course: (Considering 7 Hours per Day, 5 Days in a Week and 4 Weeks in a Month)

| Duration | Theory | Practical | On Job Training | Project Work | Total |
|---|---|---|---|---|---|
| In Hours | | | | | |
| In Days | | | | | |
| In Months | | | | | |
| Percentage | | | | | |

*Note: Theory shall be 20 to 30% and Practical shall be 80 to 70% of the Total Theory and Practical Training Period*

3. Admission Session: Yearly, Half Yearly, Quarterly, Monthly, Fortnightly, Weekly, Other Specify __________
4. Intake per batch: *25 to 30 Candidates*
5. Entry Level Qualification for Trainees:
6. Subjects: Attach Separate Syllabus Copy in below mention format
   - 6.1 Trade Subject
   - 6.2 Name of Ancillary Subject
   - 6.3 On Job Training
   - 6.4 Project Work
7. Mandatory attendance for eligibility for examination: 80% including OJT and Project Work
8. Assessment: At the end of Training Period including OJT and Project Work
9. Assessment details:

| S.N. | Assessment | Type of Assessment | Assessment by | Maximum Marks | Passing Marks |
|---|---|---|---|---|---|
| 9.1 | Trade Subject | Multi Option Objective | Assessor | 100 | 50 |
| 9.2 | Trade Practical | Practical | Assessor | 200 | 100 |
| 9.3 | Ancillary Subject | Multi Option Objective | Assessor | 50 | 25 |
| 9.4 | On Job Training | Overall Performance | Industry | 100 | 50 |
| 9.5 | Project | Project Assessment | Industry | 100 | 50 |
| 9.6 | Sessional | Overall Performance | Training Institute | 50 | 25 |
| **9.7** | | | **Total** | **600** | **300** |

10. Maximum Permissible Fees:

| S.N. | Area | Maximum Fees | Remark |
|---|---|---|---|
| 10.1 | Rural | | Rs. 50 per hour |
| 10.2 | Semi Urban | | Rs. 65 per hour |
| 10.3 | Urban | | Rs. 80 per hour |
| 10.4 | Metro (Mumbai, Pune, Nagpur) | | Rs. 100 per hour |

11. Admission and Examination Fees:

| S.N. | Particular | Fees in Rs. Per Candidate |
|---|---|---|
| 8.1 | Application Form Fees | Rs. 150 |
| 8.2 | Examination Fees | |
| 8.2.1 | Course with duration above 1 Year | Rs. 650 |
| 8.2.1 | Course with duration below 1 Year | Rs. 500 |

12. Format for Syllabus:

| S.N. | Title | Details |
|---|---|---|
| 12.1 | Instructor Qualification | |
| 12.2 | Week wise Syllabus Contents spilt up as Trade Theory, Trade Practical and Ancillary Subject | |
| 12.3 | Trade Infrastructure | |
| 12.4 | Space Norms in Sq. Meter for Workshop | |
| 12.5 | Space Norms in Sq. Meter for Class Room | |
| 12.6 | Power Norms in KW for Workshop | |
| 12.7 | Power Norms in KW for Class Room | |
| 12.8 | Machines | |
| 12.9 | Equipments | |
| 12.10 | Hand Tools | |
| 12.11 | Furniture | |
| 12.12 | Raw Material | |
| 12.13 | Stationery | |
| 12.14 | Common Facilities as Class Room, Computer Lab, Drawing Hall, etc. with remark on sharing this Infrastructure | |
| 12.15 | Approximate Total Investment as Building and Machinery | |
| 12.15.1 | Building | |
| 12.15.2 | Infrastructure | |
| 12.15.3 | Working Capital | |
| 12.15.4 | Total Investment | |
| 12.16 | Reference Course Materials | |
| 12.17 | Syllabus Committee Members | |
| 12.17 | Industry Members endorsing the Syllabus (at least 3 Top Industries in respective field) | |

13. Governing Council has the right to change the format specified herein for courses under MSCVT

## सहपत्र "ब"

(संस्थेने रु १०० च्या Non Judicial स्टॅम्प पेपर वर खालील नमुन्यात हमीपत्र सादर करावे.)

मी ________ अध्यक्ष/सचिव ________ संस्था (सोसायटी/कंपनी) ________ याना व खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्था ________ येथे सुरु केलेले आहे/करण्याचे प्रस्तावित करीत आहे. मी खालील बाबींबाबत हमी या हमीपत्राव्दारे देत आहे.

१. संस्थेतील कर्मचाऱ्यांना शासनाने कायदयानुसार वेळोवेळी विहित केलेले किमान वेतन बँक खात्यामार्फत देण्यात येते/येईल.

२. संस्था कायम विनाअनुदानित तत्वावर सुरु राहील व कोणत्याही परिस्थितीत अनुदानाची मागणी करणार नाही.

३. महाराष्ट्र राज्य व्यवसाय प्रशिक्षण परिषदेची संलग्नता प्राप्त झाल्याशिवाय प्रवेश करण्यात येणार नाहीत.

४. महाराष्ट्र राज्य व्यवसाय प्रशिक्षण परिषदेने प्रवेशपध्दती, प्रवेश नियमावली, प्रशिक्षण शुल्क, परीक्षापध्दती, परीक्षा नियमावली, परीक्षाशुल्क, इ. बाबत निर्गमित केलेल्या आदेश/निर्देश यांचे काटेकोरपणे पालन करण्यात येईल.

५. संस्थेकडे राज्य शासन /महाराष्ट्र राज्य व्यवसाय प्रशिक्षण परिषद यांची कोणतीही थकबाकी प्रलंबित नाही.

६. संस्थेस केंद्रास/कोणत्याही राज्य शासनाने काळ्या यादीत टाकलेले नाही.

७. संस्थेत प्रवेश करण्यात येत असलेल्या सर्व व्यवसाय अभ्यासक्रमांसाठी महाराष्ट्र राज्य व्यवसाय प्रशिक्षण परिषद यांनी विहित केलेल्या मानांकनानुसार प्रशिक्षणासाठी सर्व सोयी सुविधा उपलब्ध आहेत. (विद्यमान संस्थांसाठी लागू)

८. सन २०१३ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. २० "महाराष्ट्र राज्यात कृषी, पशु व मत्स्यविज्ञान, आरोग्यविज्ञान, उच्च, तंत्र व व्यवसाय शिक्षण यांमधील अनधिकृत संस्था स्थापन करण्यास आणि अनधिकृत अभ्यासपाठ्यक्रम सुरू करण्यास मनाई करण्याकरिता व तत्संबंधित किंवा तद्नुषंगिक बाबींकरिता तरतूद करण्यासाठी अधिनियम" मधील तरतुदीनुसार अनधिकृत संस्था स्थापन करण्यास आणि अनधिकृत पाठ्यक्रम सुरु करण्यास मनाई असण्याची जाणीव आहे व संस्था त्याचे उल्लंघन करणार नाही.

९. मागील आर्थिक वर्षात कर्मचाऱ्यांना बँक खात्यामार्फत वितरित केलेल्या वेतनाचा तपशिल सादर करण्यात येईल. (विद्यमान संस्थांसाठी लागू)

१०. विद्यमान अभियांत्रिकी/तंत्रनिकेतन/औद्योगिक प्रशिक्षण संस्था/इतर शैक्षणिक संस्था (असल्यास त्याबाबत तपशिल नमुद करावा) यामध्ये व्यवसाय प्रशिक्षण संस्था सुरु करावयाची असल्यास संस्था दुसऱ्या/तिसऱ्या पाळीत स्वतंत्ररित्या सुरु करण्यात येईल.

११. विद्यमान अभियांत्रिकी/तंत्रनिकेतन/औद्योगिक प्रशिक्षण संस्था इतर शैक्षणिक संस्था (असल्यास त्याबाबत तपशिल नमुद करावा) यामध्ये कौशल्य चाचणी संस्था सुरु करावयाची असल्यास कौशल्य चाचणीसाठी स्वतंत्ररित्या पूर्णवेळ परिक्षक उपलब्ध करुन देण्यात येईल.

दिनांक : ( )
ठिकाण : संचालक/अध्यक्ष/सचिव

साक्षीदार :
१)
२)

टीप :- या नमुन्यात वेळोवेळी बदल करण्याचे अधिकार परिषदेच्या नियामक मंडळास (Governing Council) राहतील.